# बृहन्मुंबई महानगरपालिका

)घन कचरा व्यवस्थापन(

सहाय्यक अभियंता )घ.क.व्य(, एफ/उत्तर विभाग, 3रा मजला, 96 भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई –400 019

**क्र. सहा.अभि./घ.क.व्य/ ओडी-1466/एफ/उत्तर दि. 30.07.2024**

## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर विभाग, 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' या योजनेअंतर्गत काम करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) / प्रस्ताव मागविण्यासाठी अर्ज मागवित आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) सदंर्भात तपशीलवार माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी website:- https://www.smpamumbai.org/Image/PDF/About AbhiyanMarathi.pdf पहावे.

एफ/उत्तर विभागात 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' योजना अंमलबजावणीसाठी विभागीय स्तरामधील इच्छुक संस्थांनीच "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजना" करीता अर्ज पूर्णपणे भरून त्यासोबत संबंधित कागदपत्रे जोडून एफर विभागउत्त/ कार्यालय, सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) रुम नं . 38, 96 भाऊ दाजी रोड, माटुंगा मुंबई –19 यांचेकडे नियोजित वेळेपूर्वी सादर करावे.

| अर्ज विक्री दिनांक | अर्ज विक्री करण्याची शेवटचा दिनांक | अर्ज जमा करण्याची शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| 30.07.2024 | 07.08.2024<br>दुपारी 11.00 वाजेपर्यंत | 07.08.2024<br>दुपारी 3.00 वाजता |

स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) अर्ज विक्रीसाठी विभागातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे ठेवण्यात आले आहेत. (अर्जाचे शुल्क रु. 1320/- अधिक GST 18% असे आहे.) अर्ज कार्यालयीन वेळेत शनिवार / रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील. दिनांक 07.08.2024 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्वारस्य अभिव्यक्तीचे अर्ज मोहोरबंद लिफाफा "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजना" असे लिहून या कार्यालयात सादर करावयाचे आहे. सर्व कागदपत्रे स्वतःची स्वाक्षांकित करुन सादर करणे गरजेचे राहील, अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज अपात्र गृहीत धरण्यात येतील. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 07.08.2024 रोजी दुपारी 03.00 नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच एफ़/उत्तर विभागात रस्ते स्वच्छता, मॅनिंग मॉपिंग व मोटर लोडर योजने अंतर्गत यापुर्वी काम केलेल्या संस्थानी काम केलेल्या कालावधीतील PF व ESIC चा भरणा केलेला आहे याची खात्री ईच्छुक संस्थांनी करावी अन्यथा संस्था अपात्र ठरविण्यात येईल. प्राप्त अर्जांची छाननी / पडताळणी करून पात्र संस्थांची यादी संबंधित विभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

सर्व संस्था चालकांनी अर्ज संपूर्ण कागदपत्रासह फाईल मध्ये घालून नंतर लिफाफ्यामध्ये घालून सिल करुन जमा करावेत.

**सही/-** 30.07.2024
**सहाय्यक अभियंता (घकव्य)**
**एफ/उत्तर विभाग**